महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
# छत्रपती संभाजीनगर-४३१ ००१.
# महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना

जा क्र शावैमवरुछसंन/मज्योफुजआयो/ /२०२५ जाहिरात क्र ०१/२०२५ 11906 दिनांक- 17 APR 2025

## "जाहिरात"

## Walk-in-interview

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर व शासकीय कर्करोग रुग्णालय छत्रपती संभाजीनगर येथे महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत खालील नमूद पदे अत्यंत तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी तत्वावर व करार पद्धतीने भरावयाची आहेत. सदरील पदांसाठी उमेदवारांनी Walk-in-interview साठी दिनांक------- वेळ ------ वाजता अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय छत्रपती संभाजीनगर येथे स्वखर्चाने सर्व मुळ कागदपत्रे व छायांकित प्रतिसह स्वत: उपस्थित राहावे. विहित वेळनंतर आलेल्या उमेदवाराचा व इ-मेल द्वारे प्राप्त अर्ज विचारात घेतला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

| अ.क्र. | पदाचे नाव | एकूण पदे | शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन प्रतिमाह |
|---|---|---|---|---|
| १ | क्ष-किरण तंत्रज्ञ / CT स्कॅन तंत्रज्ञ (X-Ray Technician/C.T. Scan Technician ) | ५ | बी.एस.सी Paramedical Technology Radiography/बी.पी.एम.टी Radiography | १५,०००/- रुपये |
| २ | विद्युत वैद्यकीय तंत्रज्ञ (Cath Lab Technician) | १ | बी.पी.एम.टी विद्युत वैद्यकीय तंत्रज्ञ | १५,०००/- रुपये |
| ३) | अंधारखोली सहाय्यक (Darkroom Assistant) | १ | बी.एस.सी Paramedical Technology Radiography/बी.पी.एम.टी Radiography | १०,०००/- रुपये |
| ३ | औषधनिर्माता (Pharmacist) | ४ | पदवी/पदविका (फार्मसी) | १५,०००/- रुपये |
| ४ | डायलेसीस तंत्रज्ञ (Dialysis Technician) | २ | बी.पी.एम.टी डायलेसिस | १५,०००/- रुपये |
| ५ | वैद्यकीय समाजसेवा अधीक्षक (मनोविकृती) (Medical Social Superintendent) | २ | एम.एस.डब्लू/एम.ए. (मानशशास्त्र)/कौन्सेलिंग डिप्लोमा | १५,०००/- रुपये |
| ६ | प्रयोगशाळा सहाय्यक (Laboratory Assistant) | ३ | बी.पी.एम.टी प्रयोगशाळा सहाय्यक/B.Sc Physics and Chemistry or Biology and Diploma or Certificate in Laboratory | १०,०००/- रुपये |
| ७ | डेटा एंट्री ऑपरेटर (संगणक लिपिक) | १५ | मान्यता प्राप्त विद्यापीठाची शाखेतील पदवी उत्तीर्ण ( विज्ञान शाखेस प्राधान्य) एम.एस.सी.आय.टी व मराठी ३० व इंग्रजी ४० टायपिंग | १०,०००/- रुपये |
| ८ | वाहन चालक (Driver) | १ | उच्च माध्यमिक शालांत परीक्षा पास व हलके/मध्यम /अवजड वाहन चालविण्याचा परवाना धारक | १०,०००/- रुपये |

- वरील सर्व पदांसाठी MSCIT उत्तीर्ण असणे बंधनकारक आहे.
- डेटा एन्ट्री ऑपरेटर या पदासाठी इंग्रजी ४० श.प्र.मी. व मराठी ३० श.प्र.मी. टायपिंग असणे बंधनकारक आहे.

## उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना

१) इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज सर्व नमूद प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकित छायांकित प्रतीसह व मुळ कागदपत्रांसह दि ------ रोजी ---- वा अधिष्ठाता कार्यालय/बजाज अध्यापन संकुल, पाणचक्की रोड, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय छत्रपती संभाजीनगर येथे Walk-in-interview साठी स्वखर्चाने उपस्थित राहावे. त्या साठी उमेदवारास कुठल्याही प्रकारचा प्रवास भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

२) उमेदवारांनी सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करून अर्ज विहित केलेल्या पद्धतीनुसारच सादर करावा, दिलेल्या नमुन्यात अर्ज सादर केलेला नसल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येईल, अर्जामध्ये दिलेली माहिती व कागदपत्रे यांच्या आधारे उमेदवाराची पात्रता/अपात्रता तपासण्यात येईल व त्या आधारे त्याचा समावेश पुढील निवड प्रक्रियेत करण्यात येईल. अर्ज स्वीकारण्यात आला किंवा पुढील निवड प्रक्रियेत समावेश करण्यात आला म्हणजे उमेदवार त्या कंत्राटी पदाकरिता पात्र आहे असा अर्थ होणार नाही. निवडीनंतर अर्जदार विहित अर्हता धारण करीत नसल्याचे किंवा कोणत्याही कारणास्तव अपात्र ठरत असल्याचे निदर्शनास आल्यास अश्या उमेदवाराची उमेदवारी वा निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

३) अर्ज स्वीकारण्यासाठी व मुलाखतीसाठी उमेदवाराने प्रत्यक्ष स्वत: उपस्थित असणे बंधनकारक आहे.

४) अर्जामध्ये दिलेली माहिती व कागदपत्रे यांच्या आधारे उमेदवाराची पात्रता / अपात्रता तपासण्यात येईल व त्या आधारे त्यांचा समावेश पुढील निवड प्रक्रियेत करण्यात येईल, तथापि अर्ज स्वीकारण्यात आला किंवा पुढील निवड प्रक्रियेत समावेश करण्यात आला म्हणजे उमेदवार त्या कंत्राटी पदाकरिता पात्र आहे असा होणार नाही. निवड प्रक्रियेदरम्यान कोणत्याही वेळी किंवा निवडीनंतर अर्जदार विहित अर्हता धारण करीत नसल्याचे किंवा कोणत्याही कारणास्तव अपात्र ठरत असल्याचे निदर्शनास आल्यास अश्या उमेदवाराची उमेदवारी वा निवड तत्काळ रद्द करण्यात येईल.

५) शासकीय कर्मचारी यांच्या पूर्वीच्या शासकीय कर्मचारी कार्यकाळात कुठल्याही प्रकारची गंभीर गुन्ह्याची नोदं नसावी किंवा झालेली नसावी.

६) सदरभरतीची प्रक्रिया पूर्ण झालेनंतर भविष्यात जर एखाद्या ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झाल्यास प्रतीक्षा यादीतील उमेदवारास नवीन भारती प्रक्रिया न करता कंत्राटी स्वरुपात नियुक्ती आदेश दिले जातील.

७) पदासमोर दिलेले मानधन हे एकत्रित मानधन असून त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.

८) लहान कुटुंबाची अट दि. २३/०७/२०२० पासून लागू करण्यातं आली असून दि. २३/०७/२०२० पासून दोन पेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार पदभरती साठी अर्ज करण्यास पात्र ठरणार नाहीत.

९) वरील सर्व पदे कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधनाची असून निवड झाल्यास प्रथम नियुक्ती ९०/१२० असेल, पुढील पूर्ण नियुक्ती (११ महिने कालावधीकरिता) आपल्या कामगिरी मुल्यांकनावर आधारित असेल.

१०) राज्यशासनाकडून वेळोवेळी निर्गमित सूचनांच्या अधिनस्त राहून पुढील योग्यती कार्यवाही करण्यात येईल.

११) प्राप्त झालेल्या अर्जाचे संगणीकरण करण्यात येऊन प्राप्त राज्यस्तरीय सूचना अधिनस्त खालील गुणांकन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.

१) पदवी – ०५ गुण
२) पदुत्तर पदवी – ०५ गुण
३) संगणक हाताळणी प्रात्यक्षिक –३० गुण.
४) प्रत्यक्ष मुलाखत – ५० गुण.
५) अर्ज केलेल्या पदाशी संबंधित शासकीय सेवेचा अनुभव – ०५ गुण.
६) अर्ज केलेल्या पदाशी संबंधित खाजगी सेवेचा अनुभव – ०५ गुण.

१२) वरील प्रमाणे यादी मुलाखतीच्या ठिकाणी प्रसिद्ध करून लिखित हरकतीसाठी ३० मिनिटांचा अवधी देण्यात येवून तद्-नंतर मुलाखतीस प्राप्त उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध करून मुलाखत घेण्यात येईल.

१३) निवड यादी व प्रतीक्षा यादी संकेत स्थळावर व नोटीस बोर्ड वर प्रसिद्ध करण्यात येईल.

१४) केंद्र / राज्य शासनाने संबंधित पदे नामंजूर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पूर्व सूचना न देता तत्काळ समाप्त करण्यात येईल.

१५) अर्जदार ह संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम असावा तसेच अर्जादाराविरूद्ध कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल नसावा.

१६) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार कामाचे ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

<u>शैक्षणिक/तांत्रिक अभ्यासक्रम व माहिती तपशील</u> -

अर्जदाराने सर्व शैक्षणिक/तांत्रिक अभ्यासक्रम इत्यादींची माहिती अर्जासोबत स्वसाक्षांकित छायांकित प्रतीसह कागदपत्रे जोडावीत.

१) शैक्षणिक अर्हतेबाबदतचा सविस्तर व अचूक तपशील अर्जात नोंद करावा.

२) उमेदवाराकडे अर्ज केलेल्या पदाकरिता आवश्यक किमान शैक्षणिक पात्रता धारण करणे बंधनकारक आहे.

३) शैक्षणिक प्रमाणपत्रात नमूद गुणांची टक्केवारी व अर्जात नमूद गुणांची टक्केवारी न जूळल्यास असे अर्ज नामंजूर करण्यात येतील.

४) कंत्राटी पदांकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता/पात्रता हि "विद्यापीठ अनुदान आयोग" (UGC Approved) मान्यता प्राप्त विद्यापीठातूनच प्राप्त केलेली असणे आवश्यक आहे. अशाच विद्यापीठातून घेतलेली शैक्षणिक अर्हता/पात्रता ग्राह्य धरण्यात येईल.

<u>अनुभवाचा तपशील</u> – अर्जदाराने सर्व अनुभवाचा तपशील अर्जासोबत नोंदवावा.

१) अर्ज करीत असलेल्या कंत्राटी पदाकरीता विहित केलेली शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचाच अनुभव ग्राह्य धरण्यात येईल. त्या नुसार शैक्षणिक अर्हता धारण करण्यापूर्वीच्या अनुभवाची नोंद करण्यात येऊ नये. त्या अनुभवाची दखल घेतली जाणार नाही.

२) अर्जामध्ये अनुभवाचा तपशील नमूद करतांना सध्याची नियुक्ती कालावधी ते पहिली नियुक्ती कालावधी या क्रमानेच नमूद करावे.

३) अनुभवाचा तपशील नमूद करीत असतांना ज्या कार्यालयाचे अनुभव प्रमाणपत्र प्राप्त आहे, अश्याच कार्यालयाचा तपशील अर्जामध्ये नमूद करावा. अनुभव प्रमाणपत्र नसल्यास सदरचा अनुभव ग्राह्य धरण्यात येणार नाही. अनुभव प्रमाणपत्रामध्ये अनुभवाचा कालावधी सुस्पष्टपणे नमूद असावा.

४) ज्या कंत्राटी पदाकरिता अर्ज केला आहे, त्या पदाशी संबंधित असलेला अनुभवच ग्राह्य धरण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर अनुभव असल्यास असा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

<u>कोणत्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे?</u>

अर्जदाराला एकापेक्षा जास्त पदांसाठी अर्ज करता येणार नाही. एका उमेदवाराला केवळ एकदाच अर्ज दिल्या जाईल.

अर्जात दिलेल्या प्रत्येक मुद्याची माहिती अचूक, सुस्पष्ट व स्वअक्षरात भरावी, एकदा अर्ज सादर करतांना भरलेल्या माहितीत खाडाखोड करण्यात येऊ नये. अर्ज सादर केल्यानंतर अर्जात कोणतेही बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

<u>वयोमर्यादा</u> - वयाचा पुरावा म्हणून जन्म प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला/माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण दाखला इ. ची स्वसाक्षांकित छायांकित प्रत अर्जासोबत जोडावी.

१) अर्ज भरतेवेळी उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे व अराखीव प्रवर्गातील उमेदवारांकरिता कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व राखीव प्रवर्गातील उमेदवारांकरिता कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहील.

<u>उमेदवाराचा फोटो व स्वाक्षरी</u>- उमेदवारांनी अलीकडच्या काळात काढलेला सुस्पष्ट फोटो व स्वयंस्वाक्षरीसह अर्जासोबत सादर करावेत.

## अटी व शर्ती

**सर्व पदांची नेमणूक ही महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत कंत्राटी तत्वावर व करार पद्धतीने मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात असेल. नियुक्ती मिळाल्यानंतर प्रथम ९० दिवस, १२० दिवस व नंतर उमेदवाराच्या कामकाजाचा आढावा घेऊन ११ महिन्यांची नियुक्ती पुढे चालू ठेवण्याबावत निर्णय घेण्यात येईल.**

१) नियुक्ती दिल्यानंतर उमेदवारांचे काम असमाधानकारक असल्यास, तसेच कामात हलगर्जीपणा केल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची सेवा समाप्त करण्याचा अधिकार संस्थेचे प्रमुख मा.अधिष्ठाता यांनी राखून ठेवले आहे व सेवा समाप्त झाल्यास उमेदवारास कोणत्याही न्यायालयात नेमणुकी संबंधी दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

२) नियुक्त कर्मचाऱ्यांना वेतनाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना सोसायटी यांच्याकडून मानधनाबाबत वेळोवेळी निश्चित व सुधारित मानधन प्राप्त झाल्यास त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

३) महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत प्री-ऑथरायजेशन ते क्लेम पेड पर्यंतची कामे तसेच वेळोवेळी मा.अधिष्ठाता/ योजनेतील अधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांनी कामासंबंधीचे जे आदेश मिळतील ती कामे करणे बंधनकारक असेल, तसे न केल्यास आपली सेवा कुठलीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येईल.

४) निवड झालेल्या उमेदवारांना नियमित शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ लागू राहणार नाही व सदर पदावर कायमचा हक्क /दावा करता येणार नाही.

५) सदरील पदांवर नियुक्तीच्या कालावधीत सेवामुक्त व्हायचे असल्यास १ महिन्याची आगाऊ नोटीस देणे बंधनकारक असेल तसे न केल्यास १ महिन्याचे वेतन शासकीय तिजोरीत जमा केल्यानंतरच कार्यमुक्त करण्यात येईल.

६) महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या अंमलबजावणीसाठी,वरिष्ठ कार्यालयाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या मार्गदर्शक सूचनांनुसार अथवा बदलानुसार पुढील नियुक्तीची कार्यवाही करण्यात येईल.

७) प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार निकष ठरूवून छाननीत पात्र उमेदवारांची मुलाखत घेण्यात येईल व गुणानुक्रमे निवड यादी व प्रतीक्षा यादी तयार करण्यात येईल, वरील निकषा नंतर एका पेक्षा अधिक उमेदवारांना समान गुण/प्रतवारी असल्यास संबंधित कामाचा अनुभव पदवीचे गुण, MS-CIT चे गुण, वय विचारात घेण्यात येईल.

८) महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात काम केलेल्या उमेदवारास प्रथम प्राधान्य राहील, तदनंतर सार्वजनिक आरोग्य विभाग व नंतर खाजगी संस्थेचा अनुभव व उल्लेखनीय कामगिरी असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल. यापूर्वीच्या सेवा कालावधीत उमेदवाराच्या कामकाजाबाबत तक्रार असल्यास त्याचा अर्जामध्ये स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. सदर तक्रारीत तथ्य आढळल्यास अश्या उमेदवारांच्या अर्जाचा निवड सूचीमध्ये समावेश करण्यात येणार नाही.

९) वरील पदांच्या उमेदवाराला मराठी भाषा लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.

१०) उमेदवारांनी चुकीची माहिती अथवा कागदपत्रे सादर केल्यास त्यांचे उमेदवारी अर्ज रद्दबादल ठरवण्यात येईल. तसेच अश्या उमेदवारांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

११) सदर पदांसाठी प्रतीक्षा यादी व गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल व त्या यादीची वैधता १ वर्ष राहील.

१२) या पूर्वी ज्यांनी अर्ज सदर केले आहेत त्या उमेदवारांनी पुन्हा अर्ज भरणे बंधन कारक आहे, तसेच यापूर्वी सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

१३) अर्जात नमूद केलेला तपशील अंतिम समजण्यात येईल, नंतर सादर केलेले कोणतेही कागदपत्रे स्वीकारली जाणार नाहीत.

**१४) निवड प्रक्रियेदरम्यान उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अश्या उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.**

**१५) निवड प्रक्रियेत कसलाही प्रकारचा वाद अथवा संभ्रम निर्माण झाल्यास निवड समिती व मा. अधिष्ठाता यांचा निर्णय अंतिम समजण्यात येईल.**

१६) उमेदवारांची नियुक्ती ही पूर्ण वेळ कामकाजासाठी असेल. तसेच रुग्णसेवेसाठी व संस्थेच्या गरजेनुसार कामकाजाच्या वेळेत बदल करण्यात येईल.

१७) निवड झालेल्या उमेदवारास नियुक्तीच्या वेळी रु.५,००० (अक्षरी रु पाच हजार ) (REFUNDABLE) एवढी सुरक्षाठेव रक्कम शासकीय तिजोरीत जमा करावी लागेल.

१८) सदरील जाहिरात संस्थेच्या संकेत स्थळावर http://www.gmcaurangabad.com प्रसिद्ध करण्यात येईल तसेच रुग्णालयाच्या सूचना फलकावर लावण्यात येईल.

१९) भरतीसंबंधीचे सर्व अधिकार मा.अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय छत्रपती संभाजी नगर यांनी राखून ठेवले आहेत (उदा.जाहिरातीच्या मजकुरात बदल करणे, पदाच्या अटी/शर्ती मध्ये बदल करणे, पदनाम व पदांच्या संख्येत बदल करणे,जाहिरात रद्द करणे,ई.).

२०) उमेदवारांनी सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करून अर्ज विहित केलेल्या पद्धतीनुसारच सादर करावा, दिलेल्या नमुन्यात अर्ज सादर केलेला नसल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. अर्जामध्ये दिलेली माहिती व कागदपत्रे यांच्या आधारे उमेदवाराची पात्रता/अपात्रता तपासण्यात येईल व त्या आधारे त्याचा समावेश पुढील निवड प्रक्रियेत करण्यात येईल. (अर्ज स्वीकारण्यात आला किंवा पुढील निवड प्रक्रियेत समावेश करण्यात आला म्हणजे उमेदवार त्या कंत्राटी पदाकरिता पात्र आहे असा अर्थ होणार नाही. निवडीनंतर अर्जदार विहित अर्हता धारण करीत नसल्याचे किंवा कोणत्याही कारणास्तव अपात्र ठरत असल्याचे निदर्शनास आल्यास अश्या उमेदवाराची उमेदवारी वा निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.)

२१) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुंटुंबाचे प्रतिज्ञापत्र)नियम २००५ नुसार अर्जासोबत जोडावयाचे लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना स्वसाक्षांकित करून अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय छत्रपती संभाजीनगर

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
छत्रपती संभाजीनगर.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर.

शासकीय वैद्यकीय कर्करोग रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर.

महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना

महत्वाच्या तारखा व वेळ

| | |
|---|---|
| जाहिरात प्रसिद्ध दिनांक | १७/०४/२५दिनांक २०२५ |
| प्रत्यक्ष मुलाखत दिनांक | २८/०४/२०२५ |
| अर्ज वितरण दिनांक व वेळ | दिनांक२८/४/२०२५ सकाळी ०९:०० ते ११:०० पर्यंत |
| अर्ज स्वीकारण्याची दिनांक व वेळ | दिनांक २८/०४/२०२५ सकाळी १०:०० ते १२:०० पर्यंत |
| प्राप्त अर्जांची यादी व प्रसिद्धी दिनांक व वेळ | दिनांक २८/०४/२०२५ दुपारी १२:३० |
| संगणक चाचणीची दिनांक व वेळ | दिनांक २८/०४/२०२५ दुपारी १:०० ते ०३:०० |
| प्रत्यक्ष मुलाखतीची दिनांक व वेळ | दिनांक २८/०४/२०२५ तांत्रिक पदांसाठी दुपारी ०२:०० वा. पासून व डेटा एन्ट्री ऑपरेटर या पदासाठी दुपारी ०३:०० वा. पासून. |
| निवड यादी प्रसिद्ध दिनांक | दिनांक २९/४/२०२५ |
| अंतिम निवड यादी व प्रतीक्षा यादी जाहीर करण्याची दिनांक | दिनांक २९/४/२०२५ |

सदरील दिनांक व वेळ यामध्ये बदल करण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर यांनी राखून ठेवले आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय छत्रपती संभाजीनगर

Dean
Government Medical College & Hospital
Chh. Sambhaji Nagar